महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(अ)/मशिसेमविप/२०१७/२४ दिनांक:- १२ सप्टेंबर, २०२३

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) गट-ब मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१७ मधील जिल्हा तांत्रिक सेवा (DTS) संवर्गाची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी व भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) सुविधेबाबत**

**संदर्भ :- जाहिरात क्रमांक — ४० /२०१७**

महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) गट-ब मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१७ मधील जिल्हा तांत्रिक सेवा (DTS) या संवर्गाची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून त्याआधारे उमेदवारांकडून भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प मागविण्यात येत आहे.

**२.** सदर तात्पुरती गुणवत्ता यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील आहे. अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्रे/ कागदपत्रे पडताळणी करताना तसेच न्यायिक प्रकरणातील निर्णयामूळे काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये बदल होऊ शकतो व पर्यायाने उमेदवाराचा गुणवत्ता क्रम बदलू शकतो, उमेदवार अपात्र ठरु शकतो.

**३.** प्रस्तुत तात्पुरती गुणवत्ता यादी विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या तसेच त्या अनुषंगाने उमेदवारांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**४.** मुळ अर्ज क्र.५६५/२०२२ व मुळ अर्ज क्र. ७३१/२०२२ वरील दिनांक २२ जून, २०२३ रोजीच्या मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार संबंधित उमेदवारांचा निकाल मोहोरबंद पाकीटात ठेवावयाचा असल्याने सदर अर्जदार उमेदवारांचा समावेश तात्पूरत्या गुणवत्ता यादीत करण्यात आलेला नाही.

**५.** प्रस्तुत परीक्षेच्या भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्याकरीता आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये 'Post Preference / Opting Out' वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ रोजी १२.०० वाजेपासून दिनांक १९ सप्टेंबर, २०२३ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

**६.** ऑनलाईन पध्दतीखेरीज अन्य कोणत्याही प्रकारे पाठविलेला भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय ग्राहय धरला जाणार नाही. तसेच याबाबत उमेदवारांची कोणतीही बाब / निवेदने / पत्रव्यवहार तद्नंतर विचारात घेतली जाणार नाहीत.

**७.** भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) विकल्पाआधारे अंतिम निकाल / शिफारशीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. तसेच भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प निवडणा-या उमेदवारांचा अंतिम निकाल प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

**८.** भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्यास कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा Support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

उप सचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)

ठिकाण — नवी मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई